प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

दि. ०९.०१.२०२०

# सिडकोतर्फे नळ जोडणीधारकांसाठी पाणी देयक ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबईतील सिडकोच्या नळ जोडणीधारकांना पाणी देयके ऑनलाइन पद्धतीने भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. १ जानेवारी २०२० पासून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ आणि यापुढील पाणी देयके ही केवळ ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारली जाणार आहेत.

नवी मुंबई क्षेत्रातील सिडको प्रशासित गावे व काही नोड्सना सिडकोतर्फे पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर गावांतील व नोड्समधील सिडकोच्या नळ जोडणीधारकांकरिता ***www.cidco.maharashtra.gov.in*** या सिडकोच्या अधिकृत संकेतस्थळावर पाणी देयके ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर संकेतस्थळावर पाणी देयके भरण्यासाठी नळ जोडणीधारकांना त्यांचा ग्राहक क्रमांक माहित असणे आवश्यक आहे. पाणी देयकाची प्रत संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्याचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नळ जोडणीधारकांना आपल्या पाणी देयकाचे शुल्क अदा करताना क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, नेट बँकिंग, आरटीजीएस, एनईएफटी, आयएमपीएस यांपैकी एका पर्यायाची निवड करता येईल. शुल्क भरणा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शुल्क भरल्याची ऑनलाइन पावतीही उपलब्ध होईल. सदर ऑनलाइन पद्धतीमुळे पाणी देयक भरण्याची प्रक्रिया अत्यंत सुलभ व जलद रीतीने पार पडून नळ जोडणीधारकांना सिडको कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची आवश्यकता भासणार नसल्याने त्यांच्या वेळेचीही बचत होणार आहे.

दि. १ जानेवारी, २०२० पासून नोड्ल कार्यालयांमधील पाणी देयक स्वीकृती केंद्रे बंद करण्यात आली असून पाणी देयके केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात येणार आहेत. तसेच रोख/चेक/डीडी अशा कोणत्याही स्वरूपात पाणी देयके स्वीकारण्यात येणार नाहीत, याचीही कृपया नळ जोडणीधारकांनी नोंद घ्यावी. ऑनलाइन पद्धतीद्वारे पाणी देयके प्राप्त करण्यास किंवा शुल्क भरण्यास काही अडचणी उद्भवल्यास नळ जोडणीधारकांनी संबंधित नोड्मधील पाणी पुरवठा विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**